विद्यालंकार ज्ञानपीठ ट्रस्ट, पर्ल सेंटर, सेनापती बापट मार्ग, दादर(प), मुंबई चे विद्यालंकार इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, वडाळ, ता. खालापूर, जि. रायगड या खाजगी संस्थेस सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यासाठी मंजूरी देण्याबाबत. . . .

## महाराष्ट्र शासन
### उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय, क्रमांक :पीईसी-२०९९/ (३७४/९९) तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ११ ऑगस्ट, १९९९.

संदर्भ : (१) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांचे क्रमांक :एफ ७४०-८९-३४६ (इ) / इटी / ९९, दिनांक ३/८/९९ चे पत्र.

<u>शासन निर्णय :</u> अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी त्यांच्या संदर्भाधीन दिनांक ३/८/१९९९ च्या पत्रान्वये विद्यालंकार ज्ञानपीठ ट्रस्ट, पर्ल सेंटर, सेनापती बापट मार्ग, दादर(प), मुंबई चे विद्यालंकार इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, वडाळ, ता. खालापूर, जि. रायगड या खाजगी संस्थेस सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यासाठी काही अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची सदर मान्यता विचारात घेता संबंधित संस्थेस सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयान्वये सदर खाजगी संस्थेस खालीलप्रमाणे पदवी अभ्यासक्रमासह व प्रवेश क्षमतेसह सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून कायम स्वरुपी विना अनुदान तत्वावर नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे. :-

| संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| विद्यालंकार ज्ञानपीठ ट्रस्ट, पर्ल सेंटर, सेनापती बापट मार्ग, दादर(प), मुंबई चे विद्यालंकार इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, वडाळ, ता. खालापूर, जि. रायगड | १. इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी | ६० |
| | २. इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग | ६० |
| | ३. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग | ६० |

सदर मान्यता ही खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच शासनाने दिनांक २२ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

२. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. व संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्र शिक्षण संचालकांच्या संमतीने संस्थेकडून समाधानकारकरित्या करण्यात येतील.

३. प्रस्तावित अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणास संस्थेने संबंधित विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे

४. सबंधित संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई-१ यांच्याकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशिर बाबींची पूर्तता करावी.

५. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार शासनाने सन १९९३-९४ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार संबंधित संस्थांचे प्रवेश संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत करण्यात येतील.

३. याबाबत आवश्यक त्या औपचारिक बाबींची पूर्तता करण्यासाठी संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००१ यांच्याशी त्वरित संपर्क साधावा. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांनी याबाबत आवश्यक त्या नोंदी अभ्यासक्रम, विषय नोंद वहीत ठेवाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( प्र. ह. क्षीरसागर )
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति, संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई
कार्यासन अधिकारी /मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
संबंधित संस्थेस

प्रत माहितीसाठी :-

१. अतिरिक्त सचिव ( तांत्रिक ) भारत शासन, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्पोर्टस कॉम्प्लेक्स, आर. पी. इस्टेट, नवी दिल्ली-११० ००२

२. सहाय्यक शिक्षण सल्लागार ( तांत्रिक ) भारत शासन, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग ), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल ॲशुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई

३. निवड नस्ती, तांशि-१